सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

**क्रमांक : २२५३/मगकसे-संयुक्त(पूर्व)/२०१९/१८** **दिनांक १८ जून, २०१९**

## - घोषणा -

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दि. १६ जून, २०१९** रोजी घेण्यात आलेल्या '**महाराष्ट्र गट-क सेवा (पूर्व) परीक्षा - २०१९**' या स्पर्धा परीक्षेच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपत्रिकेच्या चारही संचाच्या प्रथम उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

सदर परीक्षांमधील खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या आकृत्यांवर / नकाशांवर आधारित प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांना सवलत देण्याचे प्रस्तावित आहे, याची दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| संच A | संच B | संच C | संच D |
|---|---|---|---|
| ९४ | ८९ | ९३ | ९१ |

**तसेच प्रस्तुत परीक्षेसाठी उमेदवारांना प्रश्नपुस्तिकांच्या उत्तरतालिकेतील प्रश्न - उत्तरासंबंधी हरकती/अभिवेदने करावयाची असल्यास, ती आयोगाने प्रसिध्द केलेल्या हरकतीच्या नमुन्यातच करावयाची आहेत. आयोगाच्या** www.mpsc.gov.in **या संकेतस्थळावर "हरकतीचा नमुना" उपलब्ध आहे. आयोगाने विहित केलेल्या हरकतीच्या नमुन्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील हरकती स्वीकारल्या जाणार नाहीत.** उमेदवारांनी त्यांच्या हरकती विहित नमुन्यात ' परीक्षा नियंत्रक व सह सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, **५½, ७** व **८** वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१' या पत्त्यावर पाठवावीत. या संदर्भात **दि. २५ जून, २०१९** पर्यंत आयोगाकडे पोहोचलेल्या हरकतींचीच फक्त दखल घेतली जाईल. तद्नंतर आलेल्या हरकती/अभिवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : १८ जून, २०१९ परीक्षा नियंत्रक व सहसचिव
ठिकाण : मुंबई महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई